## पोलीस उप आयुक्त, कार्यालय
## गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड.
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे.

**प्रेसनोट दिनांक /०९/२०२४**

**मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाची उल्लेखनीय कामगिरी**

**रात्रीच्या वेळी मेडिकल शॉपचे शटर उचकटुन चोरी करणाऱ्या तडीपार व पाहिजे असलेल्या ०२ सराईत गुन्हेगारांना अटक करून, घरफोडी चोरीचे ०६ गुन्हे उघडकीस.**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील रात्रीच्या वेळी शटर उचकटुन घरफोडी चोरीच्या गुन्हयात वाढ झाल्याने, सदर गुन्हयास प्रतिबंध करून गुन्हे उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेकडील पथक व युनिट यांना गुन्हयांचा संमातर तपास करुन गुन्हे उघडकीस आणणे बाबत सुचना करण्यात आले होते. त्या अनुषंगाने श्री. संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड व श्री. डॉ. विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे विरोधी पथकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजय ढमाळ, यांनी अधिकारी व अंमलदार यांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील शटर उचकटुन चोरी झालेल्या गुन्हयांची माहिती संकलीत करणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे पोलीस आयुक्तालयात शटर उचकटुन चोरी झालेल्या गुन्हयांची माहिती संकलीत करून, सदर गुन्हयांच्या ठिकाणी भेटी देवुन, असंख्य सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर **पोलीस अंमलदार आशिष बनकर** यांनी संशयीत आरोपीतांची ओळख पटवुन **तडीपार आरोपी चैतन्य शिवाजी रूपनर व** रेकॉर्डवरील आरोपी **गौरव ऊर्फ गणेश खोत** हे सदरचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी **चैतन्य शिवाजी रूपनर,** व **गौरव ऊर्फ गणेश खोत, दोघे रा. चिंचवड, पुणे** यांना ताब्यात घेवुन, आरोपीचे सीसीटीव्ही फुटेज पाहुन त्यांचेकडे कौशल्यपुर्वक तपास करून, बारकाईने विचारपुस केली असता त्यांनी चिंचवड येथील मेडीकल शॉपमध्ये चोरी केल्याची कबुली दिल्याने त्यांना **चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं २७२/२०२४ भादवि कलम ४५७, ३८०** या गुन्हयात अटक केले. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपी मजकुर यांनी चिंचवड, चिखली व वाकड परीसरात शटर उचकटुन घरफोडी चोऱ्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याचेकडे चौकशी करता त्यांनी पुढील गुन्हे केल्याचे कबुल केले.

१. चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं २७२/२०२४ भादवि कलम ४५७, ३८०
२. चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं ३२१/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३)(४), ३०५(अ)
३. चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं ३२२/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३)(४), ३०५(अ)
४. चिखली पोलीस स्टेशन गुरनं ४५९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३)(४), ३०५(अ)
५. चिखली पोलीस स्टेशन गुरनं ४८४/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३)(४), ३०५(अ)
६. वाकड पोलीस स्टेशन गुरनं ९६०/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३)(४), ३०५(अ)

वरील गुन्हे उघडकीस आलेले आहेत. नमुद आरोपी हे सध्या पोलीस कोठडीत असुन, अधिक तपास मालमत्ता विरोधी पथकाचे सहा पोलीस निरीक्षक, अभिनय पवार हे करीत आहेत.

आरोपी **चैतन्य शिवाजी रूपनर** हा तडीपार असुन, त्याचे वर पुढील प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे आढळुन आले आहे.

१. चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं ५०३/२०२२ भादवि कलम ३९४, ३४
२. चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं ५०७/२०२२ भादवि कलम ४२७, ५०४, ५०६, ३४, आर्म ॲक्ट ४(२५)
३. चिखली पोलीस स्टेशन गुरनं ४६४/२०२२ भादवि कलम ४५७, ३८०
४. चिखली पोलीस स्टेशन गुरनं ४८४/२०२२ भादवि कलम ४५७, ३८०

तसेच आरोपी **गौरव ऊर्फ गणेश पंडित खोत** हा **चाकण पोलीस स्टेशन गुरनं ६६६/२०२४ भादवि कलम ३७९ व चिंचवड पोलीस स्टेशन येथे भादवि कलम ३२४** या दोन गुन्हयात पाहिजे आरोपी असुन त्याचेवर खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

१. चिंचवड पोलीस स्टेशन गुरनं १५८/२०२४ आर्म ॲक्ट ४(२५) महा पोलीस अधि कलम ३७(१)(३) सह १३५

सदर उल्लेखनीय कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सा़े. पिंपरी चिंचवड, मा. पोलीस सह आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, मा. श्री. वसंत परदेशी सा़े, अपर पोलीस आयुक्त, मा. संदीप डोईफोडे पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा. श्री डॉ. विशाल हिरे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे १, यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, सहा पोलीस निरीक्षक अभिनय पवार, पोलीस अंमलदार महेश खांडे, औदुंबर रोंगे, गणेश हिंगे, आशिष बनकर, राहूल खारगे, नितीन लोखंडे, विशाल गायकवाड, सोमनाथ मोरे, नितीन उम्रजकर, प्रशांत पाटील, गणेश कोकणे, गणेश सावंत, हर्षल कदम, सुमीत देवकर, चंद्रकांत गडदे, व समीर रासकर यांनी केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड